सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.व ३८६ ठ. क्र. ६० दि. १९/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. १२ एम.एस.आर.डी. रस्ता अचल ॲटोमोबाईल्स ते अरविंद पोलिस वसाहत पर्यंतच्या रस्त्यास **कै. समाजभूषण अनिल पंधे मार्ग** असे नामकरण करणेस व त्याप्रमाणे नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ३८५ ठ. क्र. ६१ दि. १९/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर जिजस गॉस्पल सोसायटी या समाज मंदिरामध्ये एकूण ४०० सभासद आहेत. गेल्या १० वर्षापासून हे समाज मंदिर आमच्या संस्थेच्या ताब्यात आहे. या समाज मंदिरामध्ये सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, समाज प्रबोधन व आरोग्य विषयक कार्यक्रम, गरिब मुलांना गणवेश वाटप, वहया वाटप व गरिब महिलांना साडया वाटप इ. कार्यक्रम राबविले जातात. तरी जिजस गॉस्पल सोसायटी या संस्थेस सोलापूर महानगरपालिका मा. आयुक्त यांचे दि. ५-६-२००७ चे मान्यता व मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे आदेशान्वये बापूजी नगर ब्लॉक नं. ३० लगत समाज मंदिर भाडे तत्वावर दि. ५-६-२००७ ते आजतागायत करारपत्र केलेले आहे. तरी सध्या या संस्थेस नियमानुसार २९ वर्षे ११ महिने करिता जिजस गॉस्पल सोसायटी समाज मंदिर भाडयाने मिळणेबाबत आलेल्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

याकामी दरमहा १२०० भाडेपट्टेवर भाडे आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ३९० ठ. क्र. ६२
दि. १९/५/१६ रोजी झालेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सिव्हील हॉस्पीटल, सिव्हील कोर्ट व मेडीकल कॉलेज असलेल्या चौकास **डॉ. शामाप्रसाद मुखर्जी चौक** असे नामकरण करणेस व त्याप्रमाणे नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ३८४ ठ. क्र. ६३
दि. १६/५/१६ रोजी झालेल्या खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३९७

सोलापूर शहराअंतर्गत बाळे गाव असून या गावात श्री खंडोबा मंदिर हे ४०० वर्षा पूर्वीपासूनचे मंदिर आहे. सदरचे दैवत हे सर्व जाती धर्माचे कुलदैवत असून दरवर्षी डिसेंबर महिन्यात याठिकाणी यात्रा भरत असते या वेळेस सोलापूर शहर तसेच आजूबाजूचे जिल्हयातील लाखो भाविक या दैवताच्या दर्शनासाठी येत असतात. आणि या देवस्थानच्या समोरुनच सदरचे हायवे रस्ता जात असून या हायवे रस्त्यावर नुकतेच उड्डाणपूल बांधण्यात आलेले आहे. या ठिकाणचे ग्रामस्त व लाखो भाविकांची मागणी लक्षात घेता या पूलास **श्री क्षेत्र खंडोबा उड्डाण पूल** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.७०३ ठ. क्र. ६७ दि. १८/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते मान्य झाला.



महाराष्ट्र राज्य शासनाच्या प्रधान सचिव आदरणीय मनीषा म्हैसकर मॅडम यांचे शुभहस्ते प्र.क्र. २१ मधील कर्णिक नगर परिसरात पहिले स्मार्ट चिल्ड्रन पार्कचा उद्घाटन सोहळा नुकताच थाटामाटात संपन्न झाला. तेव्हापासून आजतागायत प्रभागातील व सोलापूर शहरातील सुजाण नागरिक या चिल्ड्रन पार्कला स्मार्ट चिल्ड्रन पार्क या नांवाने ओळखते. तरी सदरील स्मार्ट चिल्ड्रन पार्कला **स्मार्ट चिल्ड्रन पार्क** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ४०४ ठ. क्र. ६५
दि. १६/५/१६ रोजी आलेला खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



श्री. सिद्राम शिवलिंग मोरे राहणार जुना विजापूर नाका, आंबेडकर नगर, सोलापूर यांची मुलगी कु. प्रीती सिद्राम मोरे हिला डेंग्यू हा आजार झाला असून साठे नर्सिंग होम लकी चौक येथील खाजगी हॉस्पीटलमध्ये उपचार घेतले आहे. श्री. सिद्राम शिवलींग मोरे हे मोलमजुरी करतात व त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची आहे व नुकतेच त्यांचे वडिलांचे निधन झाल्यामुळे संपूर्ण कुटूंबाची जबाबदारी एकटयावर पडल्यामुळे कु. प्रीती मोरे हिच्या औषधोपचारासाठी आर्थिक झळ सोसावी लागत आहे. तरी कु. प्रीती सिद्राम मोरे हिच्या औषधोपचारासाठी सोलापूर महानगरपालिकेतर्फे जास्तीत जास्त वैद्यकीय मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ४०६ ठ. क्र. ६८
दि. १९/५/१८ रोजी घेण्यात आलेल्या ठराव
सहमतीने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. १ गुमटे वस्ती, जुना तुळजापूर रोड, शेळगी सोलापूर येथील रुपाभवानी मंदिर ते गुमटे वस्ती पर्यंतत्या रस्त्यास थोर समाजसेवक **कै. मल्लिनाथ गुरुपादप्पा गुमटे** असे नामकरण करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ४०८ ठ. क्र. ६८ दि. १८/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

४०८

सोलापूर गुरुनानक चौक ते कुमठा नाका येथील रस्त्यालगतची टी.पी.३, फा.प्लॉ.नं. २३, भूखंड पृ.क्र.५८ आरक्षण क्र. ६/१२ एम.एस.ई.बी. शेजारी खुली जागेचे आरक्षण शॉपिंग सेंटर करिता असून सदर ठिकाणी मोठया प्रमाणात कचरा टाकून परिसर अस्वच्छ झालेला आहे. सदर ठिकाणी अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. महाराष्ट्र मायनॉरिटी चॅरीटेबल ट्रस्ट सोलापूर ही संस्था रजिष्टर असून सदर ठिकाणच्या जागेवर संस्था स्वखर्चाने गाळे बांधून अनेक नागरिकांना रोजगार उपलब्ध करुन देणेचा मानस आहे. सबब सदर शॉपिंग सेंटरसाठी आरक्षित असलेली जागा वर नमूद संस्थेस प्रचलित नियमानुसार २९ वर्षे ११ महिने करिता खुली जागा भाडयाने मिळणेकामी आलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ ४१३ ठ. क्र. ६५
दि. १९/५/१४ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



राणी लक्ष्मीबाई भाजी मंडई येथे १९५ भाजी व इतर वस्तुंचे विक्रेते आहेत. राणी लक्ष्मीबाई मंडई हे ओपन जागा असल्याने तेथे ४x६ वोट्टे ते १९५ विक्रेते स्वखर्चाने बांधून घेणार असल्याने ही जागा २९ वर्षे ११ महिने नाममात्र भाडयाने देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले. जागेची पाहणी करुन निर्णय घेणेकरिता

**तूर्त तहकूब**

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ४१७ ठ. क्र. ६९ दि. १६/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



## तूर्त तहकूब

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सर्वसाधारण/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र ज.४१४ ठ. क्र.७० दि. १९/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



हिप्परगांव तलाव येथील पाणी साठवण क्षमता ३ टीएमसी असून, सध्या तलावामध्ये १.२५ टीएमसी गाळ आल्यामुळे शहराच्या पाणी पुरवठयाच्यादृष्टीने गाळ काढणे महत्वाचे असून शहरातील विविध संघटना हिप्परगा तलावातील गाळ काढणेचा काम करीत आहे. ज्या सेवाभावी संघटनेचे गाळ काढण्याचे काम चालू केले आहे. त्यांचे यंत्रणेकरिता म.न.पा.चे वतीने डिझेल देणे अथवा म.न.पा.चे जेसीबीची मशिनरीद्वारे गाळ भरुन देणेकामी विनामुल्य जेसीबी उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच लोकमंगल फौंडेशन सारख्या इतर सेवाभावी संस्था करण्यास तयार असतील तर त्यांनाही देण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका